PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Bai Mothi Bhagyachi
Year: 1968

Song: Aai Yeshil Ka Maghari
Lyricist:

आई... येशील का माघारी
आई... येशील का माघारी
चांदण्यांनी का तुजसी धरिले
तुजसी धरिले
चंद्राने का तुज अडविले
तुज अडविले
ढगा आडूनी त्यांना चुकवूनी
ढगा आडूनी त्यांना चुकवूनी
लगबग ये धावूनी
आई... येशील का माघारी

नसेल जर कुणी तुझ्यासंगती
नसेल जर कुणी तुझ्यासंगती
गंगामाई तुझ्या सोबती

स्वर्ग धरेहूनी कैलासाहूनी
स्वर्ग धरेहूनी कैलासाहूनी
ये ये आपुल्या घरी
आई... येशील का माघारी

तुझ्या कुशीचा उब निवारा
तुझ्या कुशीचा उब निवारा
कुणास मागू आता आसरा
कुणास मागू आता आसरा
इथेच सरला माय पसारा
जाऊ कुठे मी तरी
आई... येशील का माघारी
आई... येशील का माघारी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*